# कविवर्य सुरेश भट ह्यांची काव्यदृष्टी

डॉ. संगीता अरूण खुरद

मराठी गझलेची सुरुवात माधव जूलियनांनी केलेली असली तरी तिचा १९६० नंतरच्या काळात विस्तार करण्याचे कार्य सुरेश भट यांनी केले. गझलेसंबंधी त्यांचा दृष्टीकोन माधव जूलियनांच्या दृष्टिकोनापेक्षा वेगळा होता. या दृष्टिकोनानुसार त्यांनी आपल्या गझलांची रचना केली. आणि काव्यप्रांतात ती गझल अमाप लोकप्रिय झाली ठरली जुन्या उर्दू कवींप्रमाणे गुरु – शिष्य परंपरा देखील भटांच्या संदर्भात दिसते. त्यांनी स्वत: कुणाला काव्याच्या क्षेत्रात आपला गुरू मानले नसले तरी त्यांना खूप शिष्य लाभले व भटांची शैली किंवा गझल काव्याच्या प्रांतामध्ये स्थिर झाली. अर्थातच भटांनी केवळ गझल या प्रकारातच लेखन केले असे नाही तर त्यांनी गीतकाव्य, नाट्यकाव्य, भावगीत या काव्यप्रकारांत देखील विपुल लेखन केले. ते पत्रकारितेच्या क्षेत्रात बरीच वर्षे कार्यरत असल्यामुळे एक पत्रकार म्हणून त्यांनी विपुल प्रमाणात गद्यलेखन केले परंतु मुख्यत्वेकरून ते कवी किंवा गझलकार म्हणूनच ओळखले गेले. आपल्या या गद्यलेखनातून त्यांनी काव्यासंबंधी विचार प्रगट केले आहेत. त्यातून त्यांच्या वेगळ्या काव्यदृष्टीवर किंवा साहित्यदृष्टीवर प्रकाश पडतो. त्यांच्या दृष्टीने असणारे काव्याचे प्रयोजन कोणते ? कवीने काव्यनिर्मिती करताना कोणत्या गोष्टींची काळजी घेतली पाहिजे ? खरे कवी कोणते व खोटे कवी कोणते ? अशा अनेक गोष्टींची चर्चा ते आपल्या लेखातून किंवा मुलाखतीमधून करताना दिसतात. अर्थात हे सर्व विचार आपली साहित्यदृष्टी प्रगट करावयाची म्हणून त्यांनी केलेले नाहीत तर ते प्रसंगपरत्वे प्रगट झाले आहेत. ह्या लेखात त्याचा शोध घेऊन त्यांच्या निश्चित अशा साहित्यदृष्टी किंवा काव्यदृष्टीचे स्वरूप ठरविता येईल काय, हे पाहण्याचा प्रयत्न केलेला आहे. एक गोष्ट मात्र निर्विवाद की,त्यांच्या साहित्यदृष्टीवर त्यांच्या जीवनदृष्टीचाही परिणाम झालेला आहे. एकादृष्टीने त्यांची साहित्यदृष्टी त्यांच्या जीवनदृष्टीशी संवादी अशीच आहे. या जीवनदृष्टीवर संतसाहित्याचा,संतांच्या व्यक्तिमत्त्वाचा गडद प्रभाव पडलेला दिसून येतो.

आपल्या काव्याच्या मागे संतकाव्याची प्रेरणा आहे हे भटांनी वारंवार नमूद केले आहे. संतांच्या प्रेरणांमुळे महाराष्ट्रीयांची अस्मिता, जीवन टिकून राहिले हे त्यांनी अनेकदा स्पष्ट केले आहे. ज्ञानेश्वरांच्या आणि तुकोबांच्या वाणीवर महाराष्ट्र पोसला गेला आहे, त्याचप्रमाणे आपली कविता देखील पोसली गेली आहे असे त्यांना वाटते.

रोज मी संताचिया दारी शिळे उच्छिष्ट खाई
अमृताने जिंकण्याला ही नसे थोडी कमाई ।
अंतरी माझ्या तुक्याची वाजताहे एकतारी
ज्ञानिया सांगे लिहाया अन् चुका काढी जनाई।

“ज्ञानेश्वर आणि तुकाराम नसते तर मी आज मराठी कवी नसतो” [१] असे ते स्पष्ट म्हणतात. ज्ञानेश्वरांची श्रेष्ठता प्रतिपादन करताना ते म्हणतात. “ज्ञानेश्वर आत्मपूजक तुच्छतावादी कवी नव्हते तर ते मानवतेचे कवी होते. त्यांच्या विश्वात्मकतेने आणि सोसलेल्या घावांनीच त्यांना संत ज्ञानेश्वर नव्हे तर मानवतेचा महाकवी बनवले.”[२] ज्ञानेश्वरांना ते मानवतेचा पुजारी तर समजतातच पण त्यांना सापेक्ष क्रांतिकारकही मानतात. आपल्यावर झालेल्या ज्ञानेश्वरांच्या संस्काराबद्दल ते लिहितात, “मला कवितेच्या बाबतीत संत ज्ञानेश्वरांनी खूप खूप दिले आहे. संत ज्ञानेश्वरांचा माझ्या कवितेवर निश्चित संस्कार झालेला आहे. अन्यथा मी लिहिलेच नसते.

माझिया गीतात वेडे दु:ख संतांचे भिनावे ।
वाळल्या वेलीस माझ्या अमृताचे फूल यावे ।
स्पंदने ज्ञानेश्वरांची माझिया वक्षात व्हावी ।
इंद्रियावाचून मीही इंद्रिये भोगून घ्यावी । ” [३]

कवितेची व्याख्या किंवा स्वरूप सांगण्याचा अनेक कवींनी आणि काव्याच्या शास्त्रकारांनी प्रयत्न केलेला आहे. या संदर्भात सुरेश भट म्हणतात “ कविता म्हणजे कमीत कमी शब्दांत जास्तीत जास्त आशय सांगणाऱ्या शब्दांचा समूह .....कविता म्हणजे संवाद असतो आणि या संवादात कवी स्वत:चे प्रत्यय,स्वत:च्या संवेदना आणि चिंतन रसिकांपर्यंत पोचवत असतो आणि त्याचवेळी ते सर्व काही स्वत:लाही सांगत असतो. तर हे जे ते अनुभवतो त्यात वाचणाऱ्याला किंवा ऐकणाऱ्याला बरोबरीने भागीदार करून घ्यायचे असते. ”[४]

यशस्वी कविता आणि फसलेली कविता ह्यातील फरक स्पष्ट करताना ते म्हणतात, “ ज्या पातळीवरून कवी शब्दांच्या माध्यमातून आपले प्रत्यय प्रगट करीत असतो त्याच पातळीवर जेव्हा रसिक येऊन पोहचतो आणि तेवढ्याच उत्कटतेने कवीचे प्रयत्न अनुभवतो तेव्हाच कविता फसली नाही, असे म्हणता येईल अर्थात ही उत्कटता ज्याच्या त्याच्या सौंदर्यबोधावर अवलंबून

अण्णासाहेब गुंडेवार महाविद्यालय, नागपूर–440013
**sangeeta.khurad@gmail.com**
**Mobile no. 9766249260**

असते आणि हा सौंदर्यबोध ज्याच्या त्याच्या जगण्यावर अवलंबून असतो."[५]

कविता केवळ आत्मानंदासाठी लिहिली जात नाही तर ती रसिकांसाठी असते व म्हणूनच कवीने माणसांना मोठे मानले पाहिजे असे ते म्हणतात सामान्यजन आणि कवी ह्यांच्यातील परस्परसंबंध स्पष्ट करताना ते म्हणतात," 'स्वांतसुखाय' हा केवळ भ्रम आहे . एवढेच नव्हे, तर ती स्वत:ची इतरांची फसवणूक असते. कवीचे सुख व आनंद त्याच्या काव्यापासून रसिकांना मिळणाऱ्या सुखावर व आनंदावरच अवलंबून असते. कारण काव्य हेच मुळी संवादासाठी असते. संवादासाठी फक्त एक माणूस लागत नाही तर एकापेक्षा जास्त माणसे लागतात. जो काव्याचा आनंद किंवा अनुभव उपभोगतो तो रसिक सुद्धा माणूस असतो म्हणून जिवंत माणसाशिवाय कवीच्या आणि कवितेच्या अस्तित्वाला काही अर्थ नाही."[६] कवींना सर्वसामान्य माणसाशी एकरूप होण्याबद्दल सांगत असताना ते म्हणतात, "रस्त्यावरच्या मराठी माणसांसह जगा त्यांच्याशी एकरूप व्हा त्यांच्याकडून अस्सल मराठी शिका फक्त स्वत:वरच प्रेम करू नका. साऱ्या माणसांना आपले माना. आपल्या बरोबरीचे माना. समीक्षक नव्हे तर मराठी माणसेच तुम्हाला तारणार आहेत."[७]

'अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी' या तुकारामाच्या उक्तीवर त्यांचा विश्वास आहे. कवितानिर्मितीसाठी आवश्यक असणारी अनुभूती कवीला प्रत्यक्ष जीवनातूनच मिळू शकते, पण त्या अनुभूतीशी कवी प्रामाणिक राहिला पाहिजे असे त्यांना म्हणायचे आहे. पुष्कळदा कवी व त्याचे जीवन किंवा वागणे ह्यात खूप तफावत आढळते साहित्यातून आदर्शाची पूजा केल्याचे सोंग आणतात पण प्रत्यक्षात त्याचे जीवन अतिशय अनादर्श असते. अशा कवींवर भटांनी टीकेची झोड उठविली व जगणे आणि लिहिणे ह्यात एकात्मता असली पाहिजे असे स्पष्टपणे प्रतिपादन केले. ते म्हणतात,"ज्याचे जगणे वेगळे आणि लिहिणे वेगळे असते त्याची कविता कमअस्सल असते. कवीचे खाजगी जीवन आणि त्याचे काव्यलेखनही दोन परस्परांशी संबंध नसलेली अगदी स्वतंत्र खाती आहेत, असा एक फॅशनेबल व सोयीचा दृष्टिकोन गेल्या कित्तेक वर्षांपासून सुखाचे हुंदके देणाऱ्या उच्चमध्यमवर्गीयांनी जिवाच्या आकांताने आपल्या नसलेल्या आत्म्याशी घट्ट कवळून ठेवला आहे........हे खरे असते तर आपल्या देशात कबीर आणि तुकाराम जन्मले नसते."[८]

संपूर्ण कविता एकदम स्फुरत असते किंवा लिहिली जात असते असे भटांना वाटत नाही.कवीच्या मनात एखादे बीज स्फुरण पावते व ते हळूहळू कागदावर उतरते हा त्यांचा अनुभव आहे. ते म्हणतात,"संपूर्ण कविता एकदम स्फुरत असते, म्हणजे ती एकदम जन्मत असते, ह्यावर माझा विश्वास नाही. कविता कुठेतरी मनात मुरत असते ती मनात मुरत असतानाच वेळोवेळी मिळणाऱ्या अनुभवातील संवेदनांच्या स्पर्शांनी आकारही घेत असते. जेव्हा आपण म्हणतो की, अमूक कवीने यंदा अमूक कविता लिहिली, तेव्हा ती कविता कवीच्या मनात कितीतरी आधी लिहिली गेलेली असते. योग्य वेळ येताच इतर अप्रयोजक व अनावश्यक शब्दांच्या गर्दीतून वाट काढीत ती ओठांवर येते किंवा कागदावर उतरते एवढेच."[९] ही वाट ते प्रयत्नपूर्वक काढतात. हे प्रयत्न ते कसे करतात ह्याला उत्तर देताना ते म्हणतात," प्रयत्नाशिवाय होत नाही. .....आजूबाजूचे शब्द बाहेर फेकावे लागतात. शिल्पकाराप्रमाणे दगड तासावा लागतो. एखाद्या जंगलातून वाटचाल करताना हव्या असणाऱ्या फुलझाडापर्यंत पोचायचे असते. पण हे जंगलही फुलझाडाचेच असते त्यातले नेमके झाड हेरायचे असते."[१०]

आपली निर्मितीप्रक्रिया अधिक स्पष्ट करताना ते म्हणतात," मी कधी झपाट्याने तर कधी आधीच्या ओळीइतकी तोलामोलाची ओळ येईपर्यंत थांबून लिहितो. माझे काव्यलेखन म्हणजे निवांत वेळातील छंद किंवा करमणूक नाही. हृदयाच्या दाखल्याविना लिहिताना पुढे सरकणे माझ्यासाठी धोकादायक असते कारण चांगले लिहिणे ही माझी नैतिक जबाबदारी आहेच; पण माझे लेखन माझे नसून ती मराठी माणसाची मालमत्ता आहे. आणि आपल्याच माणसाच्या मालमत्तेची अफरातफर करायची नसते."[११]

त्यांच्या एकूण निर्मितीप्रक्रियेत शब्दांचे महत्त्व फार आहे. त्यांच्या शब्दांच्या बाबतीत ते अतिशय जागरूक आहेत. त्यांच्या भावकवितेत अतिशय कोमल आणि नाजूक शब्द आढळतात. तर त्याची जी सामाजिक कविता आहे तिच्यात कठोर वर्णाचे शब्द आपल्याला दिसतील. आपला भाव व्यक्त करण्यासाठी अचूक शब्दांचा वापर कवीने केला पाहिजे असे त्यांना वाटते. म्हणून कवींनी शब्दांचा शोध घेतला पाहिजे व असे शब्द शोधून आपल्या भावपरिपोषासाठी त्याचा त्यांनी उपयोग केला पाहिजे असे त्यांना वाटते.या संदर्भात ते म्हणतात,"शब्द आहेत म्हणून लिहू नयेत पण जिवात जीव असेपर्यंत मराठीचे अज्ञात (म्हणजे आपणास ठाऊक नसलेले) शब्द मिरवीत राहावे. आपली मराठी भाषा म्हणजे अमृताचा महासागर आहे. ह्या महासागराच्या लाटांवर लाटा महाराष्ट्राच्या विदर्भ, मराठवाडा, खानदेश, कोकण, गोवे, पश्चिम महाराष्ट्र, आणि दक्षिण महाराष्ट्रात निरंतर उसळत असतात. प्रत्येक लाटेच्या तुषारांनी आपण आपल्या संवेदनेचे अंगअंग जमेल तेवढे भिजवून घ्यावे कुणीही सर्वज्ञ नसतो. तेव्हा कुठेही जाण्याचा प्रसंग आला तरी रिक्त मनाने परत येऊ नये."[१२]

कवीने आपली शब्दसंपत्ती नेमकी कशासाठी वाढवली पाहिजे, कवितेला त्यामुळे कोणता फायदा होतो ते स्पष्ट करताना ते म्हणतात,"आपण सामान्य माणसाकडून मराठी भाषेचे असंख्य शब्द सतत मिळवीत राहिले पाहिजे. आपण शब्दखोर बनू नये; पण आपणास अगदी हवा तोच शब्द सापडावा आणि त्याचा अचूक उपयोग करता यावा म्हणून आपली शब्दसंपत्ती वाढवली पाहिजे. महाराष्ट्राच्या कोणत्याही विभागातील बोली भाषेतील सुंदर सुंदर शब्द अगदी खास आपलेच आहेत, आपल्यासाठीच आहेत. त्याच्यातील सहज अर्थवहन करू शकणारे शब्द आपण अचूकपणे

वापरले पाहिजे. मग शब्दासाठी कुंथावे लागणार नाही. मग कवितेसाठी इंग्रजीच्या ओकाऱ्या काढाव्या लागणार नाही. मग आपल्याला धूसर, अंधुक वैगेरे लिहिण्याची गरज भासणार नाही. पण याआधी आपण आपल्या मायमराठीजवळ हट्ट धरला पाहिजे,लाडाचे मागणे केले पाहिजे.

आशयाच्या अंबरानी
टंच शब्द माझा व्हावा !
कोरडा माझा उमाळा
रोज माधुर्यात न्हावा "[१३]

कवींनी शब्दसंग्रह कसा वाढवावा व एकेक शब्द कवितेसाठी कसा खऱ्या अर्थाने फुलवावा, त्याचा पोत कसा निरखावा आणि मगच त्याचा कवितेत कसा उपयोग करावा हे सांगताना ते म्हणतात," जसा लोभी माणूस आपला बँक अकाऊंट वाढवत नेतो, तशीच आपली अभिव्यक्ती जिवंत, चैतन्यमय ठेवण्यासाठी आपण तिच्यात बोलीभाषेतील सुसंगत, समर्पक शब्दांची, वाक्प्रचाराची, म्हणींची सारखी भर घातली पाहिजे........ ज्याचे पाय मराठी मातीत रुजलेले आहेत तोच लेखक वा कवी भाषा हवी तशी वळवून घेतो. शब्द फुलवून 'अभिव्यक्ती' होत नसते, तर एकेक शब्द फुलासारखा टिपून, त्याचे वजन गुंजामासानी तोलून, संवेदनांच्या बोटांनी स्पर्श करीत त्याचा पोत निरखून मगच तो लेखणीतून कागदावर उतरवायचा असतो. खरे तर बहुतेक सर्वजण शब्द आहेत म्हणून शब्द वापरतात. चाकोरीबद्ध जगणाऱ्यांजवळ भरपूर समर्थ शब्द नसतात. आपली मराठी भाषा दरिद्री नसून आम्हीच करंटे आहोत." [१४] तथापि शब्दांच्या बाबतीत एक सावधपणा देखील बाळगला पाहिजे हे सांगताना ते लिहितात,"केवळ शब्दांच्या झगझगाटामुळे किंवा आरडाओरडीमुळे कवितेचे कवितापण ठरत नाही. नुसते शब्द फुलवून कविता प्रसन्न होत नसते. कविता लिहिताना कवीला आपण काय लिहीत आहोत ह्याची प्रत्येक वेळी स्पष्ट कल्पना असतेच असेही नाही. कवितेचा चेहरा ती लिहिली जात असतानाच हळूहळू स्पष्ट होत असतो. ती तशी आपल्या मनात संपूर्ण उभी असतेच. परंतु अनावश्यक शब्द आणि संवेदनांची जळमटे बाजूला सारून कवी कवितेपर्यंत पोचत असतो. मात्र अनेकजण अशा जळमटांनाच कविता समजतात."[१५]

कवीने शब्दांच्या मागे धावायचे नसते हे देखील त्यांनी आवर्जून सांगितले आहे. शब्दांपेक्षा जीवनानुभव अधिक महत्त्वाचा असतो. जे कवी आपल्या जीवनानुभवातील सत्य जाणून घेण्याचा प्रयत्न करतात व प्रगट करण्याचा प्रयत्न करतात त्यांना शब्द आपोआप वश होतात असे त्यांना वाटते. ते म्हणतात,"जर तुमच्याजवळ जीवनाचे सत्य असेल आणि जर तुम्ही शब्दांपेक्षा त्या सत्याला जास्त महत्त्व देत असाल, तर शब्द तुमच्याजवळ हात जोडून धावत येतील.

हा पहा लागला अर्थ बोलावया
शब्द येतील, त्यांना पुकारू नये."[१६]

शब्द हे आशयानुसारी असले पाहिजेत पण कवींना त्याचे भान नसल्यामुळे ते हवी तशी भाषा वाकवू शकत नाहीत असे त्यांना वाटते. केवळ हवेहवेसे शब्द वापरणाऱ्या कवींवर टीका करताना ते म्हणतात," वाचायाला किंवा ऐकायला लुसलुशीत वाटणारा शब्द वापरण्याची एक शब्दखोर सवय आम्हाला जडलेली आहे म्हणून आम्ही मराठी भाषा वळवू शकत नाही....... ..पण कवीपेक्षाही सामान्य मराठी माणसाची भाषा अधिक समृद्ध असते. मानवी संवेदनांमुळे होणारी त्याची प्रतिक्रिया अधिक तीव्र, सहज व प्रामाणिक असते. त्याची शब्दाची जागा अधिक सूक्ष्म व प्रखर असते. आपल्या भावना, संवेदना आणि सुख – दुःख मराठीसारख्या भाषेत, नेमक्या, अचूक, प्रभावी शब्दांत बोलून दाखविणाऱ्या कवीचे मराठी माणसे नेहमी स्वागत करतात."[१७]

शब्दाच्या निवडीच्या बाबतीतही बहुजनांच्या अभिरुचीचा किंवा त्यांच्या भाषेचा विचार भट कसा करतात हे यावरून दिसून येते. सर्वसामान्य लोकांच्या अभिरूचीचे भरण पोषण करण्याचा त्यामुळेच त्यांनी प्रयत्न केला.

चालते शिलेदारी जनासाठीच माझी
गीत माझे माझिया हातातली तलवार आहे
मी भविष्याचा प्रवास, मी पहाटेचा उजाळा
गांजलेल्या घृणेचा मी एक उच्चार आहे.

अशी स्पष्ट काव्याविषयक भूमिका त्यांनी घेतली आणि
निढळाच्या घामातून
धगधगत्या श्वासातून
त्वेशाच्या आगीतून
जाई जे ओसंडत
हे माझे अग्निगीत

असे आपल्या कवितेला मराठीतील क्रांतिपूजक काव्यसंप्रदायाशी जोडून घेतले हे त्यांना त्यांच्या बहुजनसापेक्ष काव्यदृष्टीमुळेच शक्य झाले.

काव्याचे काव्यत्व हे वृत्त किंवा यमक ह्यांच्यावर अवलंबून असते असे त्यांना वाटत नाही. गझलेशिवाय इतर काव्यप्रकार कमी दर्जाचे आहेत असे देखील त्यांना वाटत नाही. ते स्पष्ट म्हणतात की,"'गझल' ह्या काव्यप्रकाराचा मी सतत पुरस्कार करतो म्हणून मी इतर काव्यप्रकारांना तुच्छ समजत नाही. प्रत्येक काव्यप्रकार हा आपापल्या ठिकाणी सुंदरच असतो."१८

काव्याचे अस्सलत्व काव्यप्रकारावर अवलंबून नसते हे स्पष्ट करताना ते म्हणतात,"कोणताही काव्यप्रकार कमअस्सल नसतो तर स्वतःला कवी म्हणवून घेणाराच कमअस्सल असतो. शेवटी अस्सल काव्य हे अस्सलच असते. मग ते मुक्त असो की वृत्तबद्ध असो."[१९]

काव्यकलादृष्ट्या कोणता काव्यप्रकार आपणास महत्त्वाचा वाटतो या प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणतात," मी काव्याचे'हायकू' व 'पोवाडा' सोडून बहुतेक सर्वप्रकार हाताळले आहेत. मी नेहमीच्या कविताही लिहिल्या. मुक्त कविताही लिहिल्या. गीते व लावण्याही लिहिल्या......मी प्रामुख्याने जरी गझललेखन केले तरी ह्याचा अर्थ हा नाही की मी इतर काव्यप्रकारांपेक्षा हा प्रकार जास्त महत्त्वाचा मानतो."[२०]

या त्यांच्या सर्वसमावेशक आणि खुल्या काव्यदृष्टीमुळे ते गझलांचे लेखन जितक्या सहजतेने आणि उच्च दर्जाचे करू शकले तितक्याच सहजतेने त्यांनी अजरामर भावगीते आणि नाट्यगीतेदेखील निर्माण केली. त्यातील गेयता आणि तालबद्धता उच्च श्रेणीची आहे. या यशप्राप्तीबद्दल ते म्हणतात,"मी देखील (तांब्यांप्रमाणे) गुणगुणतच गझला लिहीत असतो. त्यामुळे मात्रा चुकत नाही. ज्याला चूक न करता वृत्तात लिहायचे असेल त्याने गुणगुणतच लिहायला हवे."[२१]

भटांच्या एकूण निर्मितीचा व्याप आणि साक्षेप पाहता त्यांचे व्यक्तित्त्व संपूर्णपणे कवितेशी कसे तादात्म्य पावलेले आहे हे लक्षात येते तथापि कवीचा खरा काव्यानंद कशात असतो हे स्पष्ट करताना ते म्हणतात,"जेव्हा जे मला सांगायचे आहे किंवा जे मी माझ्या संवेदनाविश्वात अनुभवतो किंवा जेव्हा मी माझ्या 'पदरात पडलेले जगण्याचे प्रत्यय'अचूकपणे नेमक्या शब्दांत जसेच्या तसे व्यक्त करू शकतो; तेव्हाच ते काव्यलेखन आनंद देते."[२२]

एकूण भटांची ही काव्यविषयक मते पाहता त्यांची काव्यदृष्टी ही जीवनसापेक्ष असल्याचे लक्षात येते. पण ती केवळ ह्या सापेक्षतेला महत्त्व देत नाही. काव्य ही कला आहे व तिच्यामध्ये प्रयत्नपूर्वक सिद्धता मिळवावी लागते. हे त्यांनी वेळोवेळी स्पष्ट केले आहे. कलेच्या प्रती त्यांच्या श्रद्धेमुळेच आणि कलात्मक गझललेखनात असाधारण नैपुण्य दाखविल्यामुळे गझलसम्राट ही पदवी त्यांना प्राप्त झाली.

संदर्भ

१. सुरेश भट, हिंडणारा सूर्य,संपा. डॉ. पुरुषोत्तम माळोदे, विजय प्रकाशन, नागपूर,२०१३,पृ.१०६

२. तत्रैव. पृ.१०७

३. तत्रैव. पृ.१०५

४. प्रदीप निफाडकर ह्यांना दिलेली मुलाखत,गझलसम्राट सुरेश भट आणि.......,नंदिनी पब्लीशिंग हाऊस,पुणे,२०१७,पृ.२४२.

५. तत्रैव. पृ.२४३

६. सुरेश भट, हिंडणारा सूर्य,संपा. डॉ. पुरुषोत्तम माळोदे. विजय प्रकाशन. नागपूर. २०१३.पृ.१०९

७. तत्रैव . पृ.१११

८. तत्रैव . पृ.११६

९. तत्रैव . पृ.१३०

१०. अक्षयकुमार काळे, प्रतीतिविभ्रम, पृ.१३५

११. प्रदीप निफाडकर ह्यांना दिलेली मुलाखत,गझलसम्राट सुरेश भट आणि.....,पुणे,२०१७,पृ.२४८

१२. सुरेश भट, हिंडणारा सूर्य,संपा. डॉ. पुरुषोत्तम माळोदे, विजय प्रकाशन, नागपूर, २०१३,पृ.११७

१३. तत्रैव. पृ. ११८

१४. प्रदीप निफाडकर ह्यांना दिलेली मुलाखत,गझलसम्राट सुरेश भट आणि....,पुणे,२०१७,पृ.२४८

१५. सुरेश भट, हिंडणारा सूर्य,संपा.डॉ. पुरुषोत्तम माळोदे, विजय प्रकाशन, नागपूर. २०१३,पृ.१९९

१६. तत्रैव. पृ. १००

१७. अक्षयकुमार काळे, प्रतीतिविभ्रम, पृ. ४७

१८. सुरेश भट, हिंडणारा सूर्य,संपा. डॉ. पुरुषोत्तम माळोदे, विजय प्रकाशन, नागपूर, २०१३,पृ.१२६

१९. तत्रैव. पृ. १२७

२०. प्रदीप निफाडकर ह्याना दिलेली मुलाखत,गझलसम्राट सुरेश भट आणि.....,पुणे,२०१७,पृ.२४३

२१. अक्षयकुमार काळे, प्रतीतिविभ्रम, पृ. १३६

२२. प्रदीप निफाडकर ह्यांना दिलेली मुलाखत,गझलसम्राट सुरेश भट आणि.......,पुणे,२०१७,पृ.२४३